# सेंटर पॉईंट स्कूलने जिंकले टीसीएस आयटी क्विझ २०१७, नागपूर फेरीचे विजेतेपद



*प्रतिनिधी / १२ सप्टेंबर*

**नागपूर :** देशातील अग्रणी कन्सल्टन्सी व बिजनेस सोल्युशन्स कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) तर्फे आयोजित भारतातील सर्वात मोठी आंतर-शालेय प्रश्नमंजुषा स्पर्धा, टीसीएस आयटी 'क्विझ'च्या नागपूर, प्रादेशिक प्रादेशिक अंतिम फेरीतील प्रश्न मंजुषेच्या पाच फेऱ्यांनंतर सेंटर पॉईंट स्कूल, वर्धमान नगरच्या अर्चित वेणूगोपालन व संचित खेडकर या विद्यार्थ्यांनी ही स्पर्धा जिंकली. या स्पर्धेत नागपूर, भिलाई, रायपूर आणि दुर्गच्या विविध शाळांच्या नऊशेवर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मंगळवारी १२ सप्टेंबरला स्थानिक वसंतराव देशपांडे सभागृह, सिव्हिल लाईन्स येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. प्रादेशिक अंतिम फेरीतील विजेत्यांना ६० हजार रुपयांचे गिफ्ट व्हाउचर्स, तर उपविजेत्या कृष्णा पब्लिक स्कूल, रायपूरच्या गौरजा ऐरोन व यशराज मिश्रा यांना ४० हजार रुपयांचे गिफ्टस व्हाउचर्स तसेच स्मृतिचिन्ह व पदक देऊन गौरविण्यात आले. यासोबतच अंतिम फेरीतील सर्व ६ स्पर्धक चमूंना टीसीएसतर्फे जिम बॅग, ओटीजी, पेनड्राइव्ह, इअरफोन्स, ब्ल्यूटूथ स्पिकर्स असे आकर्षक बक्षीस देण्यात आले. राष्ट्रीय अंतिम फेरीत भाग घेण्यासाठी विजेत्या टीमला एक शिक्षक/पालकासोबत विमानाद्वारे मुंबईला नेण्यात येणार आहे. व्हीएनआयटीचे डायरेक्टर डॉ. नरेंद्र चौधरी आणि टीसीएस नागपूरचे सेंटर हेड अरविंद कुमार यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन गिरी 'पिकब्रेन' बालसुब्रमण्यम यांनी केले.